**Press Release**

# GTDC's GoaMiles completes a successful year as Goa's first and only app-based taxi service.

- *Mega plans in store to increase facilities & fleet*

Panjim, Aug 6: GoaMiles which was launched last year on 6th August 2018 by the Goa Tourism Development Corporation (GTDC) has already achieved huge success and had been appealing to local tourist taxi operators to join the new service which has proven beneficial to the hundreds of taxi operators already in service with GoaMiles.

GoaMiles has offices both in North & South Goa which will be used to provide services to taxi drivers. GoaMiles app-based service has paid a considerable amount of Goods and Services Tax to the state government and has assured to pay with continuity.

Almost 30% of the female travelers are using the APP on a daily basis as it is an extremely secured mode of transport for passengers and 28% local Goan travelers are using the APP on a daily basis as it is extremely easy to use e & an affordable mode of transport for passengers.

GoaMiles has a new facility with additional centrally monitored command center capability to keep an eye on every trip. There have been over 65,000 downloads on the iOs App and over 2,33,770 downloads of the Android App, totaling to about 2,98,770 downloads in a span of 12 months. GoaMiles has now managed to enroll more than 1,600 taxis over the last 12 month and more joining in with every passing day.

A local taxi driver who has joined GoaMiles earns a minimum of Rs 3,500 a day without losing on commission which other app based taxi service providers charge in other states. This figure is much more than what a non GoaMiles driver earns in a day and the earning potential is directly proportional to the hard work put in by the driver.

Since its launch in August last year, GoaMiles fleet has steadily risen from 55 vehicles to 1,600 cabs. The app-based taxi service which started in August 2018 with 1,500 trips per month touched around 14,000 trips in December 2018 and in June 2019, has recorded more than 20,000 trips per month. It has set a target of increasing its trips for the financial year 2020 by 2 lakhs. Goa has around 30,000 taxi operators and around 2,500 rent-a-cab operators who are legalised and conducting authorised business' who can join the app-based aggregator.

The road ahead for GoaMiles looks very bright with a lot of innovative and creative features in the pipeline which will benefit locals and tourists. After the introduction of **Go Later** option introduced on 5$^{th}$ June 2019 which provides an advance booking choice, has led to a 20% increase in the overall booking count.

GoaMiles **Home Button** will be introduced, which will enable the driver to get the booking which is toward the path of their home. The driver can use this button twice daily this will assist him to reach home with return booking without a dry run.

GoaMiles will introduce **Local package & Out Station package** integrated on the APP, this will be like their current tourist package business. GoaMiles with the support from the Goa State Government will initiate Group Medical Insurance for GoaMiles drivers . GoaMiles will initiate Accident Coverage for any driver/driver- cum-owner on GoaMiles duty.

GoaMiles will contribute INR 1 and Goa Government INR 1 from each trip and submit the same to a government nominated fund account. These funds will be utilized to help unanticipated circumstances faced by any GoaMiles enlisted drivers.

प्रेस रीलीज

गोव्यातील पहिली अप आधारित टॅक्सी सेवा असलेल्या जीटीडीसीच्या गोवामाइल्सचा पहिला वर्धापनदिन

किंवा

जीटीडीसीने लाँच केलेली गोव्यातील पहिली अप आधारित टॅक्सी सेवा गोवामाइल्सच्या कामकाजाचे एक वर्ष पूर्ण

- भविष्यात सुविधा आणि गाड्यांची संख्या वाढवण्यासाठी भव्य योजना

पणजी, 6 ऑगस्ट - गोवा पर्यटन विकास महामंडळाने (जीटीडीसी) गेल्या वर्षी म्हणजेच 6 ऑगस्ट 2018 रोजी लाँच केलेल्या गोवामाइल्सने अभूतपूर्व यश मिळवले असून त्यात सहभागी झालेल्या शेकडो टॅक्सीचालकांसाठी ही सेवा अतिशय फायदेशीर ठरली आहे. त्यांच्याप्रमाणे प्रगती करण्यासाठी या सेवेत रूजू होण्याचे आवाहन स्थानिक पर्यटक टॅक्सी चालकांना करण्यात आले आहे.

गोवामाइल्सची उत्तर आणि दक्षिण गोव्यात मिळून दोन कार्यालये आहेत, जी टॅक्सी चालकांना सेवा देण्यासाठी वापरली जातील. गोवामाइल्स ही अपवर आधारित टॅक्सी सेवा असून तिने आतापर्यंत राज्य सरकारकडे लक्षणीय प्रमाणात वस्तू व सेवा कर भरला आहे व भविष्यातही आणखी कर भरण्याची खात्री कंपनीने दिली आहे.

30 टक्के स्त्री प्रवासी या अपचा दैनंदिन पातळीवर वापर करत आहेत, कारण ते प्रवाशांसाठी वाहतुकीचे सर्वात सुरक्षित माध्यम ठरले आहे. गोव्यातील 28 टक्के प्रवासी या अपचा दैनंदिन वापर करत आहे, कारण ते वापरण्यासाठी सोपे आहे तसेच प्रवाशांना वाहतुकीचा वाजवी पर्याय देणारे आहे.

गोवामाइल्सकडे नवे सुविधा केंद्र असून त्यात केंद्रीय देखरेख ठेवणारे अतिरिक्त आदेश केंद्र उभारण्यात आले आहे, जे वाहनाच्या प्रत्येक खेपेवर लक्ष ठेवते. आयओएसवर आतापर्यंत 65 हजार डाउनलोड्स झाले असून अँड्रॉइड अपवर 2,33,770 डाउनलोड्स झाले आहेत. यामुळे 12 महिन्यांतील एकूण डाउनलोड्सची संख्या 2,98,770 वर गेली आहे. गोवामाइल्सने गेल्या 12 महिन्यांत 1600 टॅक्सीज समाविष्ट करण्यात यश मिळवले असून प्रत्येक दिवसागणिक आणखी टॅक्सीजचा समावेश होत आहे.

गोवामाइल्समध्ये सहभागी झालेला स्थानिक टॅक्सी चालक दिवसाला किमान 3500 रुपये कमावतो व त्याला इतर राज्यांतील अप आधारित टॅक्सी सेवांप्रमाणे कमिशनही गमवावे लागत नाही. हा आकडा गोवामाइल्ससाठी काम न करणाऱ्या दुसऱ्या टॅक्सी चालकांच्या कमाईपेक्षा बराच जास्त आहे आणि ही कमाई चालक किती मेहनत घेतो त्यावर अवलंबून आहे.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये लाँच झाल्यानंतर गोवामाइल्सचा ताफा 55 वाहनांपासून 1600 कॅब्जपर्यंत वाढला आहे. ऑगस्ट 2018 मध्ये 1500 ट्रिप्ससह सुरुवात झाल्यानंतर गोवामाइल्सने डिसेंबर 2018 मध्ये 14 हजार ट्रिप्सचा टप्पा गाठला आणि जून 2019 मध्ये प्रती महिना 20 हजार ट्रिप्स पूर्ण केल्या. गोवामाइल्सने आर्थिक वर्ष 2020 साठी 2 लाख ट्रिप्सचे ध्येय ठेवले आहे. गोव्यात सुमारे 30 हजार टॅक्सी चालक असून कायदेशीर आणि अधिकृत व्यवसाय करणारे 2500 रेंट अ कॅब चालक या अप आधारित अग्रिग्रेटरमध्ये सहभागी होऊ शकतात.

गोवामाइल्सचा यापुढील मार्ग उज्ज्वल असून बऱ्याच प्रकारच्या नाविन्यपूर्ण आणि कल्पक योजना आखल्या जात आहेत, ज्यांमुळे स्थानिक व पर्यटकांना मोठा फायदा होईल. 5 जून 2019 रोजी गो लेटर हा पर्याय सुरू करण्यात आला आहेत, ज्याच्या मदतीने आगाऊ आरक्षण निवड करता येते. यामुळे एकूण आरक्षणात 20 टक्के वाढ झाली आहे.

लवकरच गोवामाइल्स होम बटन सुरू केले जाणार आहे, ज्यामुळे चालकाच्या त्याच्या घराच्या वाटेवरचे आरक्षण निवडणे शक्य होईल. चालक हे बटन दिवसातून दोनदा वापरू शकणार असून त्यामुळे त्याला घरी परतताना आरक्षणासह जाता येईल.

गोवामाइल्सद्वारे अपमध्येच स्थानिक आणि बाहेरगावचे पॅकेज समाविष्ट केले जाणार आहे, जे सध्याच्या पर्यटक पॅकेज व्यवसायाप्रमाणेच असेल. गोवा राज्य सरकारच्या पाठिंब्याने गोवामाइल्स आपल्या चालकांसाठी समूह वैद्यकीय विमा सुविधा सुरू करणार आहे. गोवामाइल्सच्या कामावर असलेल्या सर्व चालक/चालक- मालकासाठी अपघात विमा कवच दिले जाणार आहे.

गोवामाइल्स आणि गोवा सरकार प्रत्येक ट्रिपसाठी प्रत्येकी एक रुपयाचे योगदान देणार असून ही रक्कम सरकार नामोनिर्देशित निधी खात्यात जमा केली जाईल. हा निधी गोवामाइल्सवर नोंदवलेल्या चालकांना अनपेक्षित परिस्थितीत मदत करण्यासाठी वापरला जाईल.